स्थायी समितीच्या शनिवार दिनांक 16–06–2012 रोजी सकाळी 11–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. तिवारी दयाशंकर चन्द्रशेखर | अध्यक्ष |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 7. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 8. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 9. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 10. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 11. | सौ. जैस्वाल हर्षला संजय | सदस्या |
| 12. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1 | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 2 | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 3 | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 4 | सौ. अल्का अजय दलाल | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. रविन्द्र कुंभारे, अति. उपायुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 57 :– एकात्मिक रस्ते विकास योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या रस्त्यांच्या फुटपाथ/ डिव्हायडर्स इत्यादीची दुरुस्ती करुन, रंगरंगोटी व्दारे नुतनीकरण करण्याचे कामास्तव रु.4,12,35,743/– रकमेच्या एकूण 76 प्रस्तावास पद क्र. 370 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी देण्याचा तसेच या कामास्तव झोन निहाय निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन मागिल दोन आर्थिक वर्षात प्रस्तावित पदा अंतर्गत, I.R.D.P. तसेच क्रीप रस्त्यांची जी सुस्थीती व दुरुस्ती करण्यात आली त्यात फुटपाथ व इतर बाबीची दुरुस्ती झाली किंवा नाही तसेच त्या रस्त्यांच्या डांबरीकरणाची काय स्थिती आहे. व प्रस्तावित केलेली कामे त्याच कामातली आहे किंवा कसे याचा संपूर्ण सर्वेक्षीत अहवाला सहीत प्रस्तावित विषय परत स्थायी समितीस सादर करावा तसेच I.R.D.P. व क्रीप रस्त्ये ज्यांची सुस्थीती दुरुस्ती करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यांचे सर्वेक्षण करुन तसा अहवाल सादर करण्यास विषय कार्यालयास परत करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 58 :– वर्धा रोड ते जयताळा दरम्यान डिफेन्स रेल्वे लाईनच्या जागेवर वाणिज्यीक व मिश्र वापराच्या विकास करण्यास्तव प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार श्री.हाफिज कॉन्ट्रॅक्टर, वास्तुशिल्पकार यांचेशी करावयाच्या करारनाम्याच्या प्रारुपास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 59 :– नागपूर शहरात मासोळी बाजारपेठ उभारण्याच्या अनुषंगाने म.न.पा.मंगळवारी बाजार, सदर सर्व्हे क्र. 2581, मौजा जरिपटका येथे ठोक व घाऊक मासोळी विपणन केंद्र, स्थापत्य स्वरुपाचे कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. जे.बी.कंस्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा वाटाघाटीनंतर 4.93 टक्के अधिक दर असलेली रु. 2,13,28,521/– रकमेची निविदा मंजूर करण्याचा तसेच या कामास्तव आर्किटेक्ट श्री. निशीकांत एन.भिवगडे, यांची प्रकल्प व्यवस्थापकिय सल्लागार म्हणून नियुक्ती करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 60 :– नागपूर शहरात विविध चौकात बी. ओ. टी. तत्वावर Temperature, Humidity & Carban Monitaring display Instrumentation सह जाहिरात फलक लावण्याकरीता प्राप्त झालेली मे. दि कन्सेप्ट यांची रु. ३३,३०,७७७/— ची महत्तम दराची निविदा मंजुर करण्याबाबत स्थायी समिती ठराव क्र. १९, दिनांक ११.०५.२०१२ मधे नमुद केल्याप्रमाणे जे व्ही. पार्टनर मे. की कम्प्युटर्स यांचे दोन वेगवेगळया पत्रामुळे संभ्रम निर्माण झाला आहे असे स्थायी समितीस वाटत असल्यामुळे पत्रांचा नियमाप्रमाणे खुलासा करुन कार्यालयीन अभिमतानुसार जे. व्ही. पार्टनर, मे. की कम्प्युटरर्स यांचे दिनांक ०३.०५.२०१२ पत्र ग्राहय समजून ते मे. दि कन्सेप्ट चे जे. व्ही. पार्टनर आहे म्हणून नागपूर शहरात विविध चौकात बी. ओ. टी.

तत्वावर Temperature, Humidity & Carban Monitaring display Instrumentation सह जाहिरात फलक लावण्याकरीता प्राप्त झालेली मे. दि कन्सेप्ट यांची रु. ३३,३०,७७७/— ची महत्तम दराची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 61 :— उन्हाळा 2012 मध्ये नागपूर शहरातील पाणीटंचाई वस्त्यात 150 मि.मी. व 115 मि.मी. व्यासाच्या विंधन विहीरी खोदण्याचा कार्यक्रम जिल्हा परिषद नागपूरच्या GSDA Unit मार्फत त्यांचे मंजूर दरांवर राबविण्याच्या कामाच्या अंदाजित रु. 1,00,77,000/— खर्चास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 62 :— नागपूर महानगरपालिका अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागातर्फे 20 वर्षा पेक्षा जास्त आयुष्य असलेले व तांत्रिक दृष्टया अकार्यक्षम असलेले 29 वेगवेगळया प्रकारच्या वाहनांना निर्लेखन मुल्यानुसार टप्पा – टप्याने कंडम करुन घेण्यास मा. आयुक्त यांनी मंजूरी प्रदान केली आहे.

करिता प्रथम टप्यात विभागात निरुपयोगी अवस्थेत (Not working condition) मध्ये ठेवण्यात आलेले वाहन क्र. 1) MTG-3625, 2) MWY-9084, 3) MWY-9085, 4) MWY-9270, 5) MWY-9269, 6) MWY-9271, 7) MWY-9111, 8) MWY-9272, 9) MWY-9112, 10) MWY-9113, 11) MZV-9069, 12) MZV-9226, 13) MHN-9456, 14) MGW-7705, 15) MZV-2196, 16) MZV-8749, 17) MZV-9127 असे 10 नग फायर टेन्डर, 2 नग शववाहीका, 1 जीप व 4 नग मोटर सायकल असे एकुण 17 विभागीय वाहने कंडम करुन निर्लेखन मुल्यानुसार लिलाव द्वारे विक्री करुन घेण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यास्तव सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयात तसेच या सारख्या समकक्ष विषयासाठी देखरेखी करीता स्थायी समिती खालील प्रमाणे उपसमिती गठीत करते.

१. राज्यु जोतिराम लोखंडे, अध्यक्ष—उपसमिती
२. प्रफुल्ल विनोद गुडधे, सदस्य
३. सतिश वि. होले, सदस्य

उपसमितीसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 63 :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

| | |
|---|---|
| हस्ता /— हरीष दुबे | हस्ता /— दयाशंकर तिवारी |
| निगम सचिव | अध्यक्ष |
| महानगरपालिका,नागपूर | स्थायी समिती, |

महानगरपालिका,नागपूर